DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

**वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.**

**2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.**

---

**क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26**

**दिनांकः- 18/03/2020.**

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्हयातील बसस्थानकांमध्ये विविध ठिकाणी जाणे-येणेसाठी प्रवाशांची फार मोठ्या प्रमाणात गर्दी असते व बाधित क्षेत्रांतून येणा-या प्रवाशांमुळे करोना विषाणू (COVID-19) चा प्रसार व प्रादुर्भाव होण्याचा धोका असल्याने बस्थस्थानके व त्यांचा परिसर, बसस्थानकांमधील उपहारगृहे, स्वच्छतागृहे, सर्व बसेस याठिकाणी स्वच्छता व वारंवार आवश्यक ती फवारणी करणे गजरेचे आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्हयामधील सर्व बस आगार आणि बसस्थानके व त्यांचा परिसर, सर्व बसेस, बसस्थानकांमधील उपहारगृहे, स्वच्छतागृहे, वर्कशॉप (गॅरेज) इ. ठिकाणी वारंवार स्वच्छता करणे तसेच आवश्यक ती फवारणी वारंवार करण्याची कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेबाबत असे विभाग नियंत्रक, रा. प., उस्मानाबाद यांना आदेशित करीत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

-sd-

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

**प्रति,**

**विभाग नियंत्रक, रा. प., उस्मानाबाद.**



Scanned by CamScanner

**प्रत:-** 1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना माहितीस्तव.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
4. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
5. उपविभागीय अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
6. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
7. तहसिलदार सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. सर्व आगारप्रमुख, रा. प. जिल्हा उस्मानाबाद. (मार्फत संबंधित तहसिलदार)
9. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.

**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner